## प्रेसनोट दिनांक १२/०७/२०२१

**खंडणीसाठी व्यावसायिकाचे अपहरण करुन खुन करुन लाखोंची मालमत्ता घेवून फरार आरोपीस अटक**

एफ.एफ.आय चिटफंड कंपनी पिंपरीचे मालक श्री आनंद साहेबराव उणवणे, वय-४२ वर्षे, रा.नर्मदा बिल्डींग, नवीन म्हाडा बिल्डींग, मोरवाडी, पिंपरी, पुणे यांचे दि.०३.०२.२०२१ रोजी अपहरण करुन दि.०४.०२.२०२१ रोजी खुन केला होता. त्यांचा मृतदेह महाड पोलीस ठाणे हददीत दि.०५.०२.२०२१ रोजी मिळुन आला होता. त्याअनुषंगाने पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्रं. १०७/२०२१,भादंवि कलम ३६४, ३६४(अ), ३०२, ४११, २०१, १२०ब, ३८०,४१४, ३४ प्रमाणे गुन्हा दिनांक ०८/०२/२०२१ रोजी दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयामध्ये काहीएक पुरावा नसताना मा.पोलीस आयुक्त सो यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड येथील २००० पेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेज चेक करुन तांत्रिक विश्लेषनाव्दारे ७ आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यामध्ये आरोपी नामे १.बाबु ऊर्फ तुळशीराम पोकळे, २.उमेश सुधीर मोरे ३.सागर दत्तात्रय पतंगे ४.दिपक धरमसिंग चांडालीया ५.राकेश राजकुमार हेमनानी ६.कपिल ग्यानचंद हासवानी ७.प्रविण नवनाथ सोनवणे असे आरोपी अटक करुन त्यांचेकडील ४९,६१,३३८/- रुपये रकमेचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला होता. त्यानुसार सदरचे गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (१)(ii)(i),३(४) प्रमाणे कलम वाढ करण्यात आली होती. दाखल गुन्ह्यातील आरोपी नामे उमेश सुधीर मोरे याचे वडील नामे सुधीर मारुती मोरे या गुन्हयातील मुद्देमाल घेवून फरार झाले होते.

पाहिजे आरोपी विषयी काहीएक उपयुक्त माहिती नसताना मा.पोलीस आयुक्त सो यांचे मागदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषन करुन सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे सुधीर मारुती मोरे हा बंगळुरु येथे असल्याचे निष्पन्न झाले होते. त्याअनुषंगाने मा.पोलीस आयुक्त सो यांचे आदेशान्वये दि.१८.०६.२०२१ रोजी पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१ यांनी पिंपरी पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार/१३५१ दत्तात्रय निकम, पोहवा/६८४ शांताराम हांडे व पोलीस नाईक/१४५४ शहाजी धायगुडे यांचे पथक तयार करुन त्यांना बंगळुरु येथे पाठविण्यात आले होते. आरोपी हा वेषांतर करुन वेळोवेळी जागा बदलत असे. आरोपीने ५ महिन्यात केवळ १८ कॉल केलेले आहेत. तो मोबाईल बंद करुन फिरत असे. पथकातील अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषनाचे माध्यमातून बंगळुरु शहरातील विविध ठिकाणी तसेच शहराबाहेर आरोपीचा कसुन शोध घेवून नागवारा येथील मुस्लीमबहुल झोपडपट्टीवजा दाट लोकवस्तीतून अत्यंत चपळाईने व शिताफीने ताब्यात घेवून पिंपरी चिंचवड येथे आणले आहे.

आरोपी सुधीर मारुती मोरे यांचेकडून गुन्हयातील गेल्या मालातील ३८७.९४० ग्रॅम वजनाचे १७,४५,७३०/- रुपये किमतीचे सोन्याचे दागीने तसेच १०,४३,६००/- रु रोख असा २७,९०,७३०/- रकमेचा मुद्देमाल निवेदन पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आली आहे.**सदर गुन्हयामध्ये एकुण ७७,५२,०६८/- रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

सदर गुन्हयाचा तपास मा.कृष्णप्रकाश सो, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड, मा.रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी डॉ.सागर कवडे, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. सदर तपासकामी पिंपरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मिलींद वाघमारे, पो.नि.(गुन्हे)भोजराज मिसाळ, स.पो.नि.हरीश माने, पो.हवा. दत्तात्रय निकम, पो.हवा. शांताराम हांडे, पोलीस नाईक शहाजी धायगुडे यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

(मंचक इप्पर)
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, पिंपरी-चिंचवड